# <u>स्पे.मु.नं.११९/९६ मधील नि.क.६१ वर आदेश</u>

**<u>श्रीमती ताराबाई त्रिंबक पाटील</u>** ... **वादी**

**विरुध्द**

**<u>श्री.गोमा गोपाळ शेळके</u>** ... **प्रतिवादी**

**आणि**

**<u>हाशीबाई गणपत पारींगे, वगैरे</u>** ... **अर्जदार**

अर्जदार क्र १ ते ९ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२ अर्जातील थोउक्यात कथन की, दाव्यातील मिळकत ही अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ ते ९ यांचे आजोबा श्री.गणपत काना पारांगे यांनी जमीनीचे मालक त्रिंबक धर्मा पाटील यांचेकडून दि. २०/०५/१९६९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतलेली आहे. त्यामुळे सदर दाव्यात अर्जदार यांना पक्षकार म्हणून समाविष्ट करणेत यावे.

३ प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतली व कथन केले की, वाद मिळकतीत अर्जदारास कोणताही हक्क व हितसंबंध नाही. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये रे.मु.नं.८९/९५ प्रलंबित आहे. त्या दाव्यामध्ये अर्जदारांना प्रतिवादीपणात समाविष्ट करण्यात आलेले आहे. तरी, योग्य ते आदेश करणेत यावेत, ही विनंती.

४ सदरचा अर्ज वाचला. अर्जदार व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जातील कथनाप्रमाणे वाद मिळकतीशी अर्जदार यांचा संबंध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार यांना दाव्यासंबंधी

खरी वस्तुस्थिती मांडण्याची संधी देणे उचित होईल. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारांचा (नि.क्र.६१) चा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादींना निर्देशित करणेत येते की, त्यांनी अर्जदार यांना प्रतिवादीपणात सामील करुन तशी दुरुस्ती विहीत मुदतीत करुन, दाव्याची दुरुस्त प्रत न्यायालयात हजर करावी.

पनवेल. ( चं.रा.लोहार )
दि.०२/०२/२०१६ दिवाणी न्यायाधीश, व स्तर, पनवेल.